महावितरण

CIN-U40109MH2005SGC153645
E-mail: exdirse@gmail.com
Website: www.mahadiscom.com
दूरध्वनी क्रं : ०२२-६९८५२२००

कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी)यांचे कार्यालय,
प्रकाशगड, ६ वा मजला, अनंत कानेकर-मार्ग, बांन्द्रा पूर्व,
मुंबई-४०० ०५१

क्र.कासं/अंमल/परिपत्रक 000291 दि. 05 APR 2023

परिपत्रक

विषय: विजचोरीची माहिती देणा-यास उत्तेजनार्थ बक्षिस देण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्याबाबत.

संदर्भ: १) वाणिज्य परिपत्रक १४५ दिनांक २९.१२.२०११.

२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. ०७ दि. ०२.०१.२०१८.

संदर्भिय पत्र क्रं. १ नुसार विजचोरीची माहिती देणा-यास उत्तेजनार्थ बक्षिस देण्याबाबत महावितरण कडून परिपत्रक काढण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सुरक्षा व अंमलबजावणी मुख्य कार्यालयाकडून संदर्भिय पत्र क्रं. २ नुसार परिपत्रक काढण्यात आले होते.

आता बक्षीस प्रस्तावाच्या पद्धतीमध्ये एकरूपता आणणे करीता व आवश्यक पारदर्शकता निर्माण होणेसाठी बक्षिस प्रस्ताव प्रक्रियेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

बक्षीस प्रस्ताव सु. व अं. मुख्य कार्यालयास पाठविण्याची कार्यपद्धती खालील प्रमाणे.

१) माहितीगाराने दिलेल्या वीजचोरीची गोपनीय माहितीची नोंद घेण्यासाठी गोपनीय नोंदवही प्रत्येक भरारी पथक/क्षेत्रीय कार्यालय तसेच सु. व अं. परिक्षेत्र कार्यालयाने तयार करावे (त्याचा नमुना प्रपत्र २. प्रमाणे). सदर गोपनीय नोंदवही मध्ये वीजचोरीच्या माहितीव्यतिरिक्त कोणतीही अन्य माहितीची नोंद घेऊ नये.

२) माहितीगाराने विजचोरीची माहिती लेखी, इमेल अथवा तोंडी दिली असल्यास त्याची नोंद त्वरित गोपनीय नोंदवही मध्ये घेण्यात यावी.

३) गोपनीय नोंदवही हि कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करावे व ती त्यांनी स्वत:च्या ताब्यात ठेवावी.

४) माहितीगाराकडून माहिती प्राप्त झाल्यापासून संबंधित सु. व अं. कार्यालये अथवा फिरते पथक यांनी सदर माहिती प्राप्त झाल्यावर विज संचाची किंवा घटना स्थळाची तपासणी करण्यापूर्वी त्याची नोंद तात्काळ गोपनीय नोंदवही मध्ये घ्यावी व सदर विजचोरीची तपासणी करण्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर मुख्य कार्यालयास प्रपत्र-१ उल्लेख केल्याप्रमाणे email id द्वारे कळविणे अनिवार्य आहे. सदर

___पान क्रं.२ वर

माहिती Theftrewardedse@gmail.com या email id वर पाठविण्यात यावी. सदर email id व्यतिरिक्त इतर कोणत्याही पत्त्यावर पाठवू नये.

५) प्रपत्र-१ मुख्यालयास सादर करतेवेळी त्यामध्ये माहितीगाराने दिलेल्या वीजचोरीच्या माहितीचा तपशील (ग्राहकाचे नाव/ग्राहक क्रं./मीटर क्रं/ग्राहकाचा नेमका पत्ता) यापैकी किमान एक तपशील नमूद करावा तसेच त्यासोबत माहितीगाराचा अर्ज सोबत जोडण्यात यावा.

६) सपूर्ण बक्षीस रक्कम (१०%) प्रस्ताव, निर्धारण व तडजोड रक्कमेचा संपूर्ण भरणा प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत मुख्यालयास सादर करण्यात यावा. विलंबाने सादर करण्यात येणारे बक्षीस प्रस्ताव नामंजूर करण्यात येतील.

७) सु. व अं. विभागांतर्गत येणाऱ्या संबंधित कार्यालयांनी बक्षीस प्रस्ताव पाठविताना माहितीगारास बक्षीस देण्याबाबतची अथवा न देण्याबाबतची त्यांची शिफारस बक्षीस प्रस्तावामध्ये स्पष्टपणे नमूद करावी.

८) बक्षीस प्रस्तावासोबत खालील नमुद कागदपत्रांच्या सुस्पष्ट प्रती या कार्यालयास सादर करावीत.

(अ) माहितगाराने दिलेल्या माहितीचे पत्र आवक क्रमाकांच्या नोंदीसह.

(आ) आपणाकडून वरिष्ठ कार्यालयास तपासणी करण्यापूर्वी दिलेल्या माहितीच्या पत्राची प्रत (प्रपत्र १ प्रमाणे) आणि इमेल चा Screenshot.

(इ) वरील गोपनीय नोंद वहीतील सदर नोंदीची सत्य प्रत (प्रपत्र-२ प्रमाणे).

(ई) माहितीगाराचे बैंक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत/ त्याच्या बँक खात्याचा रद्द केलेला चेक आणि आधार कार्डची प्रत.

(उ) स्पॉट इन्स्पेक्शन रिपोर्ट, घटनास्थळ पंचनामा व मीटर तपासणी पंचनामा.

(ऊ) असेसमेंट शीट.

(ऋ) वीजचोरीचे बिल व वीजचोरीचे बिल भरल्याची पावती/OCCS Screenshot.

(ऌ) तडजोडीचे बिल व तडजोडीचे बिल भरल्याची पावती/ OCCS Screenshot.

सबब, वरील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करून आणि वर नमूद कागदपत्रांची पूर्तता करूनच परिपूर्ण प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात यावा.

सदर परिपत्रक तात्काळ प्रभावाने लागु करण्यात येत आहे. याविषयी निर्गमीत केलेले परिपत्रक रद्द समजण्यात यावे.

सोबत:-नमुना प्रपत्र-१ आणि प्रपत्र-२.

प्रमोद शेवाळे, भा.पो.से.
कार्यकारी संचालक (सु.व अं.),
म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई

प्रपत्र-१

प्रती,

कार्यकारी संचालक (सु.वअं.),
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
प्रकाशगड,मुंबई.

दि.

विषय:- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ या कार्यालयास माहितीगाराकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अंमलबजावणी बाबत.

वरील विषयानुसार दिनांक_ _ _ _ _ _ रोजी या कार्यालयास माहितीगाराकडून वीजचोरीची माहिती मिळाली आहे. त्याची नोंद गोपनीय नोंदवहीत घेतली आहे व त्याचा आवक क्रं. _ _ _ _ दिनांक _ _ _ _ _ _ आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने वीजचोरी उघडकीस आणण्यासाठी _ _ _ _ _ _ _ _ _ _ _भरारी पथक/क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून दिनांक _ _ _ _ _ _ _ रोजी सोबत जोडलेल्या जोडपत्रात नमूद केलेल्या वीजचोरीच्या माहितीच्या ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे.

माहितीगाराने माहिती दिलेल्या ठिकाणी वीजचोरी आढळल्यास बक्षिश मिळण्याबाबतची विनंती केली आहे. त्यानुषंगाने वीजचोरी उघडकीस आल्यास बक्षिश प्रस्ताव नंतर आपल्या कार्यालयास पाठविण्यात येईल.

सोबत:- जोडपत्र व माहितीगाराचा अर्ज

श्री._ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _
पदनाम_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _
कार्यालयाचा पत्ता _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

जोडपत्र

१. माहितीचा तपशील खालील प्रमाणे :-

२. माहितीगाराचा तपशील :-

- माहितीगाराचे नाव-

सही _ _ _ _ _ _ _ _ _ _

पदनाम _ _ _ _ _ _ _ _ _ _

कार्यालय_ _ _ _ _ _ _ _ _ _

प्रपत्र- २

गोपनीय रजिस्टर आवक क्रं व दिनांक	माहितीगाराचे नाव व पत्ता	माहिती सदर कार्यालयास प्राप्त झाल्याची दिनांक	वीजचोरीच्या माहितीचा तपशील	वीजचोरीचा प्रकार	माहितीगाराने उत्तेजनार्थ बक्षीस मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे काय? हो/नाही	प्रपत्र १ नुसार मुख्य कार्यालयास माहिती कळवल्याची दिनांक	शेरा